वाचले- १) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७

२) शासन निर्णय ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग क्र. एपिटी/१०००/प्र.क्र.७/१३ दि.०६/०६/२००१

३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/०३/२००३

४) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्र.सीबीसी१०/२००४/प्र.क्र.५७०मसचग-५ दि. ०५/०३/२००५

५) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही २०००/प्र.क्र.१७/ २०००/१२, दि.०१/०७/२००५

६) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.अनियो१००५/१२६/सेवा४ दि. ३१/१०/२००५

७) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रकक्र.सीबीसी १०/२००६प्र.क्र.१५/मावक५ दि. ०५/०६/२००६

८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रनिमं-२००७/प्र.क्र.(४६/०७)/१३-अ दि.१९/१०/२००७

९) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रनिमं-२००७/प्र.क्र.(४६/०७)/१३-अ दि.२७/०६/२००८

१०) महाराष्ट्र शासन वित्त विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडीलशासन निर्णय क्र.आंक-१०१०/प्रक्र -१/ २०१० वित्तीय सुधारण -१ दि. ०५/०६/२०१०

११) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१२/प्र.क्र.१८६/१२ दि.२८/०२/२०१३

१२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग प्रनिम-१२१४/प्र.क्र.(४३/०७)/१३-अ दि.०५/०६/२०१४

१३) शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.एपिटी-२०१४/प्र.क्र.१३९/आस्था-८ दि.०५/०७/२०१४.

१४) शासन पत्र ग्रामविकास विभाग, क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क्र.१२८/आस्था-८ दि.१८/०२/२०२१

१५) ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण२०२२/प्र.क्र.११/आस्था८ दि. १५/११/२०२२

१६) सामान्य प्रशासन विभाग कडील शासन निर्णय क्र.सनिव२०२३/प्र.क्र.१४/कार्या१२ दि.०३/०३/२०२३

१७) ग्रामविकास विभाग कडील शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२३/प्र.क्र.४०/आस्था८ दि.१६/०३/२०२३

१८) मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा) यांचेकडील पत्र.साप्रवि/आस्था१/भरती/वशि८४४/५८६३/२०२४, दि.०६/०९/२०२४ ने प्राप्त निकाल

१९) या कार्यालयाकडील मूळ कागदपत्र पडताळणी दि. १२/०९/२०२४ व दि.१८/०९/२०२४

२०) ग्रामविकास व पंचायतराज विभाग यांचेकडील क्रमांक:पदम-३१२४/प्र.क्र.२५१/आस्था-८, दि.११/१२/२०२४ व दि.२२/०१/२०२५.

२१) ग्रामविकास व पंचायतराज विभाग यांचेकडील क्रमांक:पदम-४३२४/प्र.क्र.३५९/आस्था-८, दि.१३/०६/२०२५.

२२) मा. अध्यक्ष, निवड समिती, तथा जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडील दि.१२/०३/२०२५ व दि.१४/०८/२०२५ रोजीचे मंजूरी.

२३) या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दिनांक- २५/०८/२०२५

---

जा.क्र.जिपसां/ग्रापं/आस्था-०४/भरती/ /२०२५
ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, सांगली.
दिनांक - २६/०८/२०२५

## आदेश

ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, सांगली १ ते २१ मधील तरतूदीनुसार सरळसेवा भरतीमधील निवड यादीतील खालील उमेदवारांची जिल्हा सेवा (गट क) जिल्हा सेवा वर्ग ३ (दुय्यम ग्रामसेवक) कार्यकारी अणि ग्रामविस्तार प्रथम श्रेणी, कंत्राटी ग्रामसेवक या पदावर एकत्रित मानधन रु.१६०००/- तसेच नियमाप्रमाणे कायम प्रवासभत्ता यामध्ये निवड करणेत येवून त्यांची पदस्थापना जिल्हा परिषद सांगली अंतर्गत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पंचायत समिती अधिनस्त असलेल्या रिक्त पदावर करणेत येत आहे.

| अ. क्र. | निवड यादीतील क्र. | उमेदरावाचे नांव व पत्ता | मूळ प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | श्री. निलेश अशोक बागुलकर<br>मु. गोरेगांव, पो. साखरखेडा,<br>ता. सिदखेड राजा, जि. बुलडाणा<br>पिन कोड -४४३२०२ | इ.मा.व. | इ.मा.व. (अराखीव-दिव्यांग) | पंचायत समिती कडेगाव |

| अ. क्र. | निवड यादीतील क्र. | उमेदरावाचे नांव व पत्ता | मूळ प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| २ | ६ | श्री. रुषिकेश दत्तात्रय जाधव<br>मु.पो. शाहुनगर केलवड,<br>ता. जि. बुलडाणा पिन कोड ४४३००१ | इ.मा.व. | आ.दु.घ. (अराखीव-दिव्यांग) | पंचायत समिती कडेगाव |
| ३ | १ | श्री. प्रदीप माणिक मिसाळ<br>मु. पो. चिणके, ता. सांगोला,<br>जि. सांगली पिन कोड-४१३३०८ | आ.दु.व | आ.दु.घ (अराखीव-माजीसैनिक) | पंचायत समिती जत |
| ४ | १ | श्री. गळवे प्रमोद लक्ष्मण<br>रा. गळवेवस्ती, विठलापूर,<br>ता. आटपाडी, जि सांगली,<br>पिन कोड ४१५३०१ | इ.मा.व. | इ.मा.व. (अराखीव) | पंचायत समिती आटपाडी |
| ५ | १ | श्री. पांडूरंग शेषेराव मारखड<br>रा. चेनापूर, पो. लहान, ता. अर्धापूर,<br>जि नांदेड, पिन कोड ४३१७०४ | अ.ज. | अ.ज. (अराखीव) | पंचायत समिती कवठे महाकाळ |
| ६ | १ | श्री. अनिल जहांगीर पावरा<br>मु. उमराणी बु., पो. ता. धडगांव,<br>जि. नंदूरबार पिन काडे-४२५४१४ | अ.ज. | अ.ज. (अराखीव माजीसैनिक) | पंचायत समिती तासगाव |

**सदरची निवड खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात येत आहे.**

१) आपली नियुक्ती कंत्राटी ग्रामसेवक पदावरी हजर दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीवर तात्पुरत्या स्वरुपात केली असून, कोणतीही आगाऊ सूचना न देता अगर कोणतीही कारणे न दाखविता संबंधितास कंत्राटी ग्रामसेवक या पदावरुन केंव्हाही कमी करणेत येईल व त्याबाबतची त्याची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. सदरची अट मान्य असलेबाबत त्यांचेकडून रुजू होणेपूर्वी लेखी निवेदन घेणेचे आहे.

२) कंत्राटी ग्रामसेवक म्हणून आपणास दरमहा रु.१६०००/-(अक्षरी रु.सोळा हजार मात्र) मानधन आणि नियमित ग्रामसेवकाप्रमाणे कायम प्रवासभत्ता देणेत येईल. त्याखेरीज इतर कोणतेही वित्तीय लाभ अनुज्ञेय असणार नाही.

३) कंत्राटी ग्रामसेवकांना दोन महिन्याच्या सेवेसाठी एक नैमित्तीक रजा किंवा कॅलेंडर वर्षात ६ नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील. अनुज्ञेय नसलेल्या रजा उपभोगलेस कंत्राटी कालावधी त्याप्रमाणे वाढविणेत येईल. महिला कर्मचाऱ्यांना प्रचलित नियमानुसार प्रसुती रजा अनुज्ञेय राहील.

४) उमेदवाराने नेमणुकीचे ठिकाणी या आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत हजर होणेचे आहे. उमेदवार मुदतीत हजर झाला नाही, तर त्यांची नियुक्ती आपोआप रद्द होईल. याबाबत उमेदवारास कोणताही दावा अगर हक्क सांगता येणार नाही.

५) नेमणुकीच्या जागी हजर होणेसाठी कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

६) रुजू तारखेपासून दोन महिन्याचे आत उमेदवारास महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकरणाकडून वैदयकिय तपासणी प्रमाणपत्र सादर करणेच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

७) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील २० नुसार ज्यांची पहिली पत्नी हयात आहे, अशा कर्मचाऱ्यास दुसरा विवाह करता येणार नाही. उमेदवार हजर होताच त्यांचेकडून भारत सरकार व भारताची घटना या विषयी एकनिष्ठ राहीन अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र विहित नमुन्यात भरुन घेणेचे आहे.

८) कंत्राटी ग्रामसेवक हमीपत्रातून मुक्त व्हावयाचे असल्यास आपणास नियुक्ती प्राधिकाऱ्यास गट विकास अधिकारी यांचेमार्फत किमान १ महिना आगोदर पुर्वसूचना दयावी लागेल अथवा एक महिन्याचे मानधनाची रक्कम नियुक्ती प्राधिकरणाकडे जमा करणे आवश्यक आहे.

९) कंत्राटी ग्रामसेवक म्हणून आपणास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्या पंचायत समितीमध्ये पदस्थापना देतील तेथे विनातक्रार हजर व्हावे लागेल.

१०) कंत्राटी कालावधीत आपल्याकडून कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तणुक झालेची आढळून आलेस आपली निवड रद्द करणेत येईल. त्यासाठी निवडपत्रातील कालावधी बंधनकारक असणार नाही.

११) संबंधित उमेदवाराने पदस्थापनेच्या ठिकाणी वास्तव्य करणे बंधनकार राहील.

१२) संबंधित उमेदवारास महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग दिनांक २८ मार्च २००५ आणि शासन परिपत्रक दिनांक ०१ जुलै २००५ मधील नमूद महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहिल.

१३) उमेदवाराची नियुक्ती जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडील नियुक्त पुर्व चारित्र्य पडताळणी अहवालाचे अधिन राहील. याबाबतचे अहवालात काही आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्यास सदरची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१४) सदर निवडीबाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशी अंती तथ्य दिसून आल्यास आपण सदर पदाच्या निवडीसाठी सादर केलेली माहिती चुकीची आढळून आल्यास आपली निवड काणेत्याही टप्यावर कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.

१५) कंत्राटी ग्रामसेवक पदावर काम करताना वक्तशीरपणा, वर्तणुक चांगली ठेवणे बंधनकारक राहिल. तसेच कोणत्याही बेकायदेशीर संप/मोर्चा यामध्ये भाग घेता येणार नाही.

१६) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.वशिअ/१२१४/प्रक्र.२६/११ दिनांक ०२ जून २०१४ नुसार संबंधित उमेदवारांनी प्रथम नियुक्तीच्यावेळी नियुक्तीच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या कालावधीत त्याची स्वत:ची मालमत्ता व दायित्वे या बददलची विवरणपत्रे, प्रपत्र एक, दोन व तीन या तीन प्रपत्रामध्ये (म्हणजे (अ) अचल मालमत्तेचे विवरणपत्र (ब) चल मालमत्तेचे विवरणपत्र आणि (क) कर्ज व इतर दायित्वे या बददलचे विवरणपत्र) नियुक्ती कार्यालयास सादर करणेचे आहे. तसेच यानंतर प्रत्येक वर्षी त्या त्या वर्षाच्या ३१ मार्चच्या स्थितीस अनुसरुन ३१ मे अखेर सादर करणे बंधनकारक राहिल.

१७) महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दिनांक १२ डिसेंबर २०११ अन्वये सदरची नियुक्ती जात वैधता प्रमाणपत्राशिवाय दिलेली आहे. तरी आपण सदर शासन निर्णयास अनुसरुन सहा महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे. जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही अथवा जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविले तर नियुक्ती रद्द करुन उमेदवाराची सेवा समाप्त करण्यात येतील. या सेवा कालावधीचा कोणत्याही प्रकारचा हक्क अगर दावा उमेदवारास सांगता येणार नाही.

१८) सदर पदावरील तीन वर्षाचा कंत्राटी कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर लेखी परीक्षा न घेता (सेवेत आल्यानंतर प्रत्येक कर्मचा-यासाठी सेवा प्रवेशोत्तर परीक्षा सक्तीची असल्याने) मंजूर पदाच्या उपलब्धतेनुसार सेवा नियमित केली जाईल.

१९) सदरचे नियुक्ती आदेश प्राप्त होताच सुरक्षा ठेव म्हणून रु.१०,०००/- नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे भरावी लागेल त्याचप्रमाणे र.रु.१००/- च्या स्टॅम्पवर २ प्रतिष्ठीत व्यक्तीचे जामीनपत्र लिहून त्यांचे ७/१२ चे उतारे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) जिल्हा परिषद, सांगली यांचेकडे सादर केल्यानंतरच आपणास पदस्थापना ठिकाणी हजर करुन घेतले जाईल.

२०) सदर नियुक्तीच्या अनुषंगाने शासनाकडून अथवा न्यायालयाकडून निर्देश / निर्णय प्राप्त झालेस त्यानुसार आपली निवड काणेत्याही टप्यावर कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.

२१) सदर आदेशातील अ. क्र. ३ व ६ या उमेदवारांना नमूद संदर्भ क्र. २० व २१ अन्वये ज्या-त्या समाजिक समांतर आरक्षणातील माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने त्या-त्या सामाजिक आरक्षणातील अराखीव प्रतिक्षा सूचीतील पात्र उमेदवारांना नियुक्ती देणेत आलेली आहे.

२२) सदर आदेशातील अ. क्र. ३ या उमेदवारास नमूद संदर्भ क्र. २१ अन्वये खुला समाजिक आरक्षणातील अंशकालिन या समांतर आरक्षणामध्ये उमेदवार उपलब्ध न झाल्याने खुला समाजिक आरक्षणातील अराखीव प्रतिक्षा सूचीमधून पात्र उमेदवारास नियुक्ती देणेत आलेली आहे.

तृप्ती धोडमिसे (भाप्रसे),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली.

प्रति,
१) श्री., रा. ,

**प्रत:-माहितीस्तव सादर**

मा.अध्यक्ष, जिल्हानिवड समिती, तथा,जिल्हाधिकारी,सांगली

**प्रत-माहितीसाठी व कार्यावाहीस्तव**

१) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) /(ग्रापं), जिल्हा परिषद, सांगली.
२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.
३) गट विकास अधिकारी (श्रेणी-१), पंचायत समिती,
२/- संबंधितास नमूद अटी व शर्तीनुसार पुर्तता करुन कामावर रुजू करुन घेवून अहवाल सादर करावा. सदर उमेदवारांना कामाकाज शिकण्याच्यादृष्टीने कमी लोकसंख्या असलेली ग्रामपंचायत देणेची कार्यवाही करावी. उमेदवार मुदतीत हजर न झालेस तसे तात्काळ कळवावे.
४) निवड संचिका